# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १५/०४/२०२४ (सोमवार) सकाळ


---

## पोस्टे खापा अंतर्गत मिरवणुकी दरम्यान झालेल्या प्रसंगाचे मा. पोलीस अधीक्षक यांचे चौकशीचे आदेश

दिनांक १४/०४/२०२४ रोजी पोस्टे खापा अंतर्गत गुमगाव खदान येथे **मा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती** निमीत्ताने मिरवणुक निघाली. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार पोलीस डीजे वादयाला बंद करत होती. गुमगाव माइन येथील मिरवणुकीमध्ये १५० ते २०० नागरीक सहभागी होते. यावेळी सदर मिरवणुकीमध्ये डीजे वादयाचा वापर होत होता. त्यामुळे पोलीस स्टेशन खापा येथील पोउपनि मिलींद गेडाम, पोलीस अंमलदार गणेश बघनुरे हे सदर डीजे वादय बंद करण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु सदर डीजे बंद करण्यासाठी त्यांनी जास्त बळाचा वापर केला. त्यामुळे मिरवणुकीमधील एका इसम किरकोळ जखमी झाला.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार हे पोलीस स्टेशन खापा येथे भेट देवुन प्रथम हे तपासले की, पोलीस अधीक्षक यांनी जे आदेश दिले होते की, चालत असलेले मिरवणुकीवर कोणत्याही बळाचा वापर करायचा नाही. या आदेशाचे उल्लंघन झालेले आढळुन आल्याने मा. पोलीस अधीक्षक यांनी पोलीस स्टेशन खापा येथील पोउपनि मिलींद गेडाम, पोलीस अंमलदार गणेश बघनुरे यांचे निलंबनाचे आदेश काढले. व त्याबाबत प्राथमिक चौकशीचे आदेश काढला. त्यानंतर त्यांनी मिरवणुकीमधील सहभागी नागरीकांशी संवाद साधला व त्यांच्या ज्या समस्या आहेत त्याचे निराकरण केले. ज्या पोलीस उपनिरीक्षक अधिकाऱ्याने सदरची कार्यवाही केली व त्यामध्ये जखमी झालेले इसम हे एकाच समाजामधील आहेत. यावरून कोणीही सदर घटनेबाबत जातीय स्वरूप देवुन दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न करील व तसेच सोशल मिडीया व इतर माध्यमातुन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न करील त्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर